**जिल्हा नियोजन समिती,**
**जिल्हा नियोजन भवन, माउंट रोड. सदर,नागपूर**
टेलिफोन नं. 0712-2560071 ई-मेल : dpodpcnagpur@yahoo.com

क्र. जिनिस/जिवायो/ग्राजविअ/का-6/ 1438 /2025 दिनांक: 18 /10/2025

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2025-26**
**ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान**
**(लेखाशीर्ष-25151793)**

**संदर्भ** :- 1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शा.नि. क्र. जिवायो १००७ /प्र.क्र.३९/का-१४४४ दिनांक 16.02.2008
2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र. ददभू-2010/प्र.क्र.62/पंरा-6 दिनांक 16.9.2010
3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र.जनसु-2017/प्र.क्र.111/यो-06 दिनांक 25.01.2018
4) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नागपूर यांचे पत्र क्र.जिपना/पंचा/स्था-11/जिवायो /2598/2024 दिनांक 24/07/2025 व समक्रमांकाचे पत्र क्र. 2847/2025 दिनांक 14/08/2025, पत्र क्र.12870/2025 दिनांक 14/08/2025, पत्र क्र.3177/2025 दिनांक 26/09/2025, पत्र क्र.3392/2025 दि. 15/10/2025
5) दिनांक 18.08.2025 रोजी झालेली जिल्हा नियोजन समितीची बैठक.
6) या कार्यालयाचे निधी वितरण आदेश क्र.जिनिस/जिवायो/जनसु/का-6/1336/2025 दिनांक 30.09.2025
7) या कार्यालयाचे निधी वितरण आदेश क्र.जिनिस/जिवायो/जनसु/का-6/1423/2025 दिनांक 17.10.2025
8) मा. पालकमंत्री, तथा महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य, यांचे पत्र जा.क्र.मंत्री/ज.मो./को.अ.129/25 दिनांक 10.10.2025

**निधी वितरण आदेश**

उपरोक्त शासन निर्णय क्र.1 नुसार सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थाकडील योजना/कामे वगळून या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे व निधी वितरणाचे अधिकार जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, यांना प्रदान केले आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाकडील योजना/कामांना प्रशसकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाना आहेत.

जिल्हा वार्षिक योजना 2025-26 (सर्वसाधारण) अंतर्गत ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान (25151793) या जिल्हास्तरीय योजनेचे निकष व मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र. 2 व 3 वरील शासन निर्णयान्वये विहीत केले आहेत. त्यानुसार संदर्भ क्र.4 अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान (25151793) या योजनेतंर्गत खर्च भागविण्यासाठी ग्रामपंचायत अंतर्गत रुपये 347.49 कोटी किमतीची एकूण 2871 कामांचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे मान्यतेस्तव सादर केलेले आहे.

जिल्हा वार्षिक योजना 2025-26 (सर्वसाधारण) ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान (25151793) योजनेतंर्गत रु.47.00 कोटी चा नियतव्यय मंजूर असून अपूर्ण कामावर (Spill) द्यावयाच्या निधी रु.23.66 कोटी वजा जाता रु.23.34 कोटी निधी नविन कामावर वितरीत करण्याकरिता उपलब्ध आहे. संदर्भ क्र.6 च्या आदेशान्वये रुपये 29.51 कोटीच्या एकूण 348 कामांना मान्यता प्रदान करून रुपये 11.80 कोटी निधीचे वितरण कार्यान्विती यंत्रणेस करण्यात आले असून संदर्भ क्र.7 च्या आदेशान्वये रुपये 6.24 कोटीच्या एकूण 62 कामांना मान्यता प्रदान करून रुपये 1.58 कोटी निधीचे वितरण यापूर्वी कार्यान्विती यंत्रणेस करण्यात आले आहे. त्यानुषंगाने आता संदर्भ क्र.8 च्या पत्रान्वये

मा. पालकमंत्री, तथा महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी सुचविल्यानुसार जिल्हा परिषदेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांपैकी जिल्हा नियोजन समितीने दिलेल्या निर्देशानुसार पुनर्विनियोजनानंतर उपलब्ध होणाऱ्या निधीच्या दीड पटीच्या मर्यादेत **"परिशिष्ट अ"** मधील कामांना मंजुरी देण्यात येत आहे.

तेव्हा जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नागपूर यांना शासन निर्णय क्र. 1 नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2025-26 अंतर्गत ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान (25151793) योजनेखाली जिल्हा परिषदेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या कामापैकी **रुपये 4.30 कोटी अंदाजित किंमतीच्या एकूण 48 नविन कामांना उपलब्ध निधीचे मर्यादेत मान्यता प्रदान करून कामांसाठी एकूण रु.2.15 कोटी (अक्षरी रुपये दोन कोटी पंधरा लक्ष फक्त) इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून वितरीत करण्यास मंजूरी देत आहे.**

सदर निधी संगणक वितरण प्रणालीद्वारे (BDS) कार्यवाही यंत्रणेस वितरीत करण्यात येत असून यंत्रणेनी कामांना सुरुवात करण्यापूर्वी कामाचे सविस्तर अंदाजपत्रके तयार करून त्यास सक्षम अधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करून प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही करावी. प्रस्तावित कामे यापूर्वी कोणत्याही योजनेमध्ये प्रस्तावित किंवा पूर्ण झाली नाही याची खात्री करावी. तसेच मान्यता प्रदान कामाची शिफारस जिल्हापरिषद/ ग्रामपंचायतीकडून झालेली नसल्यास अशी कामे वगळण्याचे प्रस्ताव सादर करावा. तसेच मान्यता प्रदान कामाचा समाविष्ट प्रस्तावित केलेल्या कामांच्या यादीमध्ये समाविष्ट नसल्यास अशी कामे सुद्धा वगळण्याबाबत प्रस्ताव सादर करावा. तसेच योजनेवर होणारा खर्च खालील लेखा शिर्षाखाली सन 2025-26 या आर्थिक वर्षात उपलब्ध होणा-या निधीतून भागविण्यात यावा.

**योजनेचे नाव:- ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान (25151793)**

**कार्यान्विती यंत्रणा:- उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर**

( रु. कोटीत)

| मंजूर नियतव्यय | लेखाशीर्ष | सन 2025-26 मध्ये दिलेली प्रशासकीय मान्यता | | | सन 2025-26 मधील वितरीत निधी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | यापूर्वी | या आदेशान्वये | एकूण | यापूर्वी | या आदेशान्वये | एकूण |
| 47.00 | मागणी क्र.ओ.62<br>2515 इतर ग्राम विकास कार्यक्रम<br>198 ग्रामपंचायतींना सहाय्य,<br>(55) जिल्हा योजना नागपूर<br>(55)(01) ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदान<br>(2515 1793) | 35.75 | 4.30 | 40.05 | 13.38 | 2.15 | 15.53 |

**(या आदेशान्वये वितरीत निधी अक्षरी रुपये दोन कोटी पंधरा लक्ष फक्त)**

**(डॉ. विपीन, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती, नागपूर**

**अटी व शर्ती**

1. संदर्भ क्र. 2 ते 3 अन्वये शासन निर्णय अन्वये विहित व वेळोवळी विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान (25151793) या योजने अंतर्गत फक्त अनुज्ञेय असलेली विहित खर्चाच्या मर्यादेत कामे घेण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत या योजनेत अनुज्ञेय समाविष्ट नसलेली कामे घेण्यात येऊ नयेत. अन्यथा याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्विती यंत्रणेची राहील.

2. योजनेबाबत शासनाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना, निकष, तपासणी सूची, अटी व शर्तीचे पालन करुन योजनांवर /कामांवर खर्च करणे कार्यान्वयीन यंत्रणेस बंधनकारक राहील.
3. सदर काम संभाव्य सिंचन प्रकल्प, रस्ते, विशेष आर्थिक क्षेत्र इत्यादी प्रकल्पाखाली जाणार नाही याबाबत खात्री करून घ्यावी.
4. जिल्हा वार्षिक योजनेतून प्रस्तुत करण्यात आलेली कामे अनधिकृत/बेकायदेशीर/वादग्रस्त अशा जागेवर होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
5. प्रस्तावित रस्ता/इमारत/बंधारे किंवा अन्य कामांची जागा शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी अंमलबजावणी अधिकारी यांची राहील.
6. शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवर रस्ता/इमारत/बंधारे किंवा अन्य कामे हाती घेण्यापूर्वी सक्षम अधिकारी यांची परवानगी / ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी अंमलबजावणी अधिकारी यांची राहील.
7. प्रस्तावित बांधकामे हाती घेतांना सार्वजनिक बांधकाम विभाग / पाटबंधारे विभाग / जलसंपदा विभाग/ कृषी विभाग इ. सबंधित विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.
8. मंजूर केलेली बांधकामे ही प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केलेले नकाशे व अंदाजपत्रका नुसारच कार्यान्वित करावीत त्यामध्ये फेरबदल करता येणार नाही.
9. सदर काम अथवा कामाचा भाग या कार्यक्रमाव्यतिरीक्त इतर कोणत्याही योजनांतर्गत अथवा योजनेतर कामात अंतर्भूत नाही, कामाची द्विरूक्ती होणार नाही याची खात्री करूनच कामास सुरूवात करावी. अन्यथा याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
10. प्रशासकीय मान्यता देतांना काही अटी व शर्ती असल्यास त्याची पूर्तता करणे बंधनकारक राहील.
11. जिल्हा परिषदेच्या अधिनस्त असलेल्या रस्त्याच्या संदर्भामध्ये जि.प. चे ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येऊ नये.
12. कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी सबंधित कार्यान्विती यंत्रणेची राहील.
13. योजना राबविण्याची सनियंत्रण व देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची किंवा शासकीय अभिकरणाची राहील.
14. कामाचे वेगवेगळे पातळीचे छायाचित्र काढून वेळोवेळी सादर करावे व अभिलेख्यासाठी संग्रही ठेवावे.
15. योजना पूर्ण होण्यास एकापेक्षा अधिक वर्षाचा कालावधी लागणार असल्यास त्या योजनांच्या पूर्ततेबाबत वेळोवेळी संनियंत्रणाव्दारे योजना वेळेतच पूर्ण होण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.
16. या योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामांची नोंद मालमत्ता नोंदवहीत करून त्या कामाचे परीरक्षण करण्याची खबरदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावी.
17. खर्चाची बाब शासन मान्य असल्याची खात्री केल्यावरच योजनांवर खर्च करावा. Contigency charge, Computerisation charge, Insurance charge तसेच E.T.P. charge यापैकी अनुज्ञेय असलेल्या बाबींवर व अनुज्ञेय प्रमाणातच खर्च करण्यात यावा.
18. या योजनेच्या कामावर प्रशासकीय मान्यता किंमती पेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.
19. या योजनेच्या कामावर चालू आर्थिक वर्षात मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच प्राप्त निधी चालू वित्तीय वर्षातच खर्च करण्यात यावा.
20. जिल्हा योजनांकरीता वितरीत केलेले अनुदान ज्या योजनेकरीता/प्रयोजना करीता मंजूर करण्यात आले आहे. त्याच योजनेवर/ प्रयोजनांसाठी खर्च करणे बंधनकारक राहील.
21. आपल्या प्रशासकीय विभागाने दिलेल्या सूचनानुसार/लेखापद्धतीप्रमाणे या कार्यक्रमाचा हिशेब योजनानिहाय स्वतंत्र ठेवावा.
22. अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधीची पूर्ण तरतूद केल्यानंतरच नविन कामे घेता येईल.
23. योजना पूर्ण झाल्यावर त्यावर पुन्हा तरतुद केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
24. अर्थसंकल्पिय तरतूद उपलब्ध झाल्यानंतर व वित्तिय मंजूरी प्राप्त झाल्यावरच कामास सुरूवात करण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.
25. या कार्यक्रमावर होणारा खर्च रोखप्रवाहानुसार करावा.
26. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनांच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्ण झाल्याबरोबर काम पूर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनियोजन लेखे इत्यादी बाबतची माहिती आपल्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागास व या कार्यालयास सादर करावी.

27. जिल्हा वार्षिक योजनेच्या अंमलबजावणीतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती आणि विधीमंडळ कामकाज, न्यायालयीन प्रकरण इत्यादी बाबींसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.
28. जिल्हा योजनेसंबंधी विधीमंडळास माहिती सादर करणे, तसेच विधीमंडळाच्या मागदर्शक सूचनांचे पालन करणे, अर्थसंकल्पिय नियमावलीच्या तरतुदीनुसार विविध बाबीसंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासकीय विभागाची राहील.
29. कार्यान्वयीन यंत्रणेने योजनेंतर्गत कामनिहाय खर्च व भौतीक प्रगतीचा मासिक अहवाल दरमहा 05 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.
30. सदर योजनेस देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता ही योजनेची अंमलबजावणी करण्यापूर्वी सक्षम अधिका-याकडून तांत्रिक मान्यता प्राप्त करण्याचे अधीन राहून देण्यात आलेली आहे. तांत्रिक मान्यता मिळाल्याशिवाय कार्यान्वयीन यंत्रणेने कार्यारंभ आदेश, खरेदी, बांधकाम इ. आदेश देऊ नयेत. अन्यथा याची संपूर्ण जबाबदारी ही सबंधित कार्यान्वयीण यंत्रणेची राहील.
31. सदर योजनेबाबत शासनाने ठरवून दिलेले निर्णय / मार्गदर्शक तत्वे यामधील दिशा-निर्देशानुसार योजनेची अंमलबजावणी व याजनेवरील खर्च करणे / योजना राबविणे अनिवार्य आहे. अन्यथा याबाबतची जबाबदारी ही कार्यान्वयीण यंत्रणेची राहील.

**(डॉ. विपीन, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती, नागपूर**

**प्रत** - **माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह सादर/अग्रेषित**

१. मा. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-32
२. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
३. महालेखापाल, महाराष्ट्र- 2 नागपूर (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता)

**प्रत** - **माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नागपूर
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
४. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
५. लेखा अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, नागपूर

**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती, नागपूर**

## "परिशिष्ट अ"

| जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान (२५१५१७९३) अंतर्गत मान्यता प्रदान कामे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | पंचायत समिती | ग्रामपंचायतीचे नाव | गावाचे नाव | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये लाखात) | या आदेशाद्वारे वितरीत करण्यात येणारा निधी (रुपये लाखात) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पारशिवनी | गवणा (गरंडा) | गरंडा | मौजा गरंडा येथे पाणि पुरवठा विहीर पासुन ते दफन भुमी पर्यंत सिमेंट कॉंक्रिट रोड बांधकाम करणे (अंदाजे 200 मी) | 10.00 | 5.00 |
| 2 | पारशिवनी | बोरी (सिंगारदीप) | बोरी (सिंगारदीप) | गट ग्राम पंचायत बोरी सिंगारदीप येथे स्मशान घाट सौदर्यीकरण करणे. | 10.00 | 5.00 |
| 3 | पारशिवनी | निमखेडा (तेलंगखडी) | निमखेडा | गट ग्राम पंचायत निमखेडा (तेलंगखडी) अंतर्गत मौजा निमखेडा येथे स्मशानभूमी सौदर्यीकरण करणे. | 10.00 | 5.00 |
| 4 | पारशिवनी | जुनिकामठी | जुनिकामठी | मौजा जुनिकामठी येथे श्री. मन्नु सिरीया यांच्या शेता पासुन ते श्री. राहुल फार्म पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 8.00 | 4.00 |
| 5 | रामटेक | पटगोवारी | पटगोवारी | मौजा पटगोवारी हेटीटोला येथे स्मशानभुमी जाणारा रस्ता बांधकाम करणे | 10.00 | 5.00 |
| 6 | रामटेक | खनोरा | खनोरा | मौजा खनोरा येथे श्री गुरु खंडाते ते श्री. रविंद्र खडांते यांच्या घरापर्यंत सिमेंट नाली बांधकाम करणे. | 5.00 | 2.50 |
| 7 | रामटेक | सोनेघाट | कवडक | गट ग्रामपंचायत सोनेघाट अंतर्गत मौजा कवडक येथे महादेव जवादे यांच्या घरापासुन ते घनश्याम ढवळे यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 8 | कामठी | लोनखैरी (नांदा) | नांदा | मौजा नांदा पांडे ले-आऊट वार्ड क्र. 3 येथे श्री अंगत खैरे ते श्री अनासने यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 9 | मौदा | चाचेर | चाचेर | गट ग्राम पंचायत चाचेर येथे श्री. शैलेश कोरपकर यांचे घरापासुन ते लक्ष्मण राहांगडाले यांचे घरापर्यंत सिमेंट नाली बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 10 | मौदा | बेरडेपार | खंडाळा गुजर | श्री.मंगेश महाजन ते दिलीप शंभरकर यांच्या घरापर्यत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | 5.00 | 2.50 |
| 11 | मौदा | बेरडेपार | बेरडेपार | श्री.विकास नाटकर ते बालचंद नाटकर यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | 5.00 | 2.50 |
| 12 | मौदा | भांदेवाडी | शिवाडौली | श्री.चंद्रशेखर रामटेके ते सुनिल कोलते ते मुख्ख रस्ता पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | 10.00 | 5.00 |
| 13 | मौदा | इंदोरा | इंद्रपुरी | मौजा इंद्रपुरी येथे सिमेंट रस्ता बांधकाम करणे | 10.00 | 5.00 |
| 14 | मौदा | वाकेश्वर | वाकेश्वर | मौजा वाकेश्वर येथे सिमेंट रस्ता बांधकाम करणे | 10.00 | 5.00 |
| 15 | मौदा | सिरसोली | वायगाव | मौजा वायगाव येथे सिमेंट रस्ता बांधकाम करणे | 10.00 | 5.00 |

| अ. क्र. | पंचायत समिती | ग्रामपंचायतीचे नाव | गावाचे नाव | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये लाखात) | या आदेशाद्वारे वितरीत करण्यात येणारा निधी (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 16 | मौदा | पिंपळगाव | पिंपळगाव | मौजा पिंपळगाव अंतर्गत मुख्य रस्ता ते कनोजे गॅस गोडाउन पर्यंत येथे सिमेंट रस्ता बांधकाम करणे | 5.00 | 2.50 |
| 17 | मौदा | नांदगाव | नांदगाव | मौजा नांदगाव येथील गेंदलाल पटले ते गोमा लांजेवार यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | 5.00 | 2.50 |
| 18 | कुही | राजोला | राजोला | श्री. गजानन वैद्य यांच्या घरापासुन पाण्याच्या टाकीपर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 19 | कळमेश्वर | वरोडा | वरोडा | हनुमान मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक लावणे. | 10.00 | 5.00 |
| 20 | कळमेश्वर | तोंडाखैरी (बेल्लोरी) | तोंडाखैरी | रामदास हेलोंडे यांच्या घरापासून ते गोवरी कळमेश्वर डांबरी रोड पयंत सिमेंट रस्ता | 10.00 | 5.00 |
| 21 | कळमेश्वर | भंडागी | भंडागी | प्रविणजी धोटे यांच्या घरापासून ते आबाजी देशमुख यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे बांधकाम व ग्रामपंचायत येथे वॉटर फिल्टर प्लाँट तयार करणे. | 10.00 | 5.00 |
| 22 | कळमेश्वर | उपरवाही | उपरवाही | बब्बु शाहू यांच्या घरापासून ते सहकार हायस्कूल पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 23 | कळमेश्वर | कन्याडोल | कन्याडोल | दामोदर गावंडे यांच्या घरापासून ते संजय राऊत यांच्या घरा पर्यंत भुमिगत नाली बांधकाम करणे. | 10.00 | 5 |
| 24 | कळमेश्वर | कन्याडोल कोकुर्डा | कोकुर्डा | मातामाय ते उर्मिला बन्सोड ते हनुमान मंदिर पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 5 |
| 25 | कळमेश्वर | सुसुंद्री सवंद्री | सुसुंद्री सवंद्री | नागोराव नेऊल ते नवनाथ ढ़ाले यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम व दौलत ढ़ाले ते सचिन लांडे यांच्या घरापर्यंत पांदन रस्ता व खडीकरण करणे. | 10.00 | 5 |
| 26 | सावनेर | टेंभुरडोह (माहारकुड) | टेंभुरडोह (माहारकुड) | टेंभुरडोह येथील अपुर्ण राहीलेल्या स्मशान भुमीच्या वॉल कम्पाउंडचे बांधकाम करणे. | 10.00 | 5 |
| 27 | सावनेर | खुबाळा | रिसोळा | रिसोळा येथील सिमेंट रस्त्यांचे बांधकाम करणे. | 10.00 | 5 |
| 28 | सावनेर | खैरी (प) | ढ़कारा | मौजा ढ़कारा वार्ड क्र. २ येथील श्री. सेवकराम कान्होले यांच्या घरापासून ते नाल्यापर्यंत भुमिगत आर.सी. नाली बांधकाम करणे व श्री.महेंद्र सौसागडे यांच्या घरापासून ते श्री. योगराज गुरारीकर यांच्या शेताच्या नाल्यापर्यंत भुमिगत नाल्याचे बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 29 | सावनेर | खैरी (प) | रामडोंगरी | मौजा रामडोंगरी वार्ड क्र. ३ येथील श्री. जितेंद्र तवले यांच्या घरापासून ते श्री. योगेश गोखे यांच्या शेतापर्यंत आर.सी.सी. नाली बांधकाम करणे. | 5.00 | 2.5 |

| अ. क्र. | पंचायत समिती | ग्रामपंचायतीचे नाव | गावाचे नाव | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये लाखात) | या आदेशाद्वारे वितरीत करण्यात येणारा निधी (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 30 | सावनेर | किरनापूर | किरनापूर | मौजा किरनापूर वार्ड क्र. १ येथील ग्रामपंचायत भवण विस्तारिकरण व मौजा वाघोली येथील आर.सी.सी. नालीचे बांधकाम करणे तसेच मौजा दफई येथील सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 5 |
| 31 | सावनेर | सिंदेवानी (टेकाडी) | सिंदेवानी (टेकाडी) | श्री. ओमप्रकश यांच्या घरापासून ते श्री. शंकर बावनकर यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बाधणे तसेच मौजा टेकाडी येथील स्मशान भुमी पर्यंत ३०० मिटर सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 7.00 | 3.5 |
| 32 | सावनेर | सिरोजी (सुरेवानी) | सिरोजी (सुरेवानी) | मौजा सिरोजी येथील श्रीमती मृदुका रागोसे यांच्या घरापासून ते श्रीमती प्रतिमा गजभिये यांच्या घरापर्यंत ३०० मिटर सिमेंट रस्त्यांचे बांधकाम करणे तसेच श्री. हरिदास बाजनघाटे यांच्या घरापासून ते हनुमान मंदीर पर्यंत ३०० मिटर पर्यंत सिमेंट रस्त्यांचे बांधकाम करणे. | 10.00 | 5 |
| 33 | सावनेर | नागलवाडी (भोंडेताल) | नागलवाडी (भोंडेताल) | मौजा नागलवाडी येथील स्मशानभुमीमधील अपुर्ण राहीलेले वॉलकम्पाउंडचे बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 34 | सावनेर | निमतलाई (कुसुंबी) | निमतलाई (कुसुंबी) | मौजा निमतलाई (कुसुंबी) येथील श्री. यशवंत इडपाची यांच्या घरापासून ते श्री. प्रदिप सोनवणे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्त्यांचे बांधकाम करणे तसेच श्री. सुधाकर वाघाडे यांच्या घरापासून ते श्री. मोतीराम घ्यार यांच्या घरापर्यंत अंदाजे ३०० मिटर रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 35 | सावनेर | आजनी (शेरडी,खेडी) | आजनी (शेरडी,खेडी) | मौजा शेरडी येथे भुमिगत सिमेंट नाली बांधकाम करणे. | 5.00 | 2.50 |
| 36 | सावनेर | वाकोडी | वाकोडी | मौजा वाकोडी येथे स्मशानघाट बांधकाम करणे | 10.00 | 5.00 |
| 37 | सावनेर | गुमगाव | गुमगाव | मौजा गुमगाव येथील रस्त्यांचे खडीकरण करणे. | 10.00 | 5.00 |
| 38 | नरखेड | रोहणा | रोहणा | मौजा रोहणा येथे ग्रा.पं. कार्यालयाकरीता संरक्षण भिंत बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 39 | नरखेड | पिंपळगाव (रा.) | पिंपळगाव (रा.) | मौजा पिंपळगाव (राऊत) येथे जानराव ठोकणे ते हंसराज राऊत ते दशरथ राऊत ते गांव तलावपर्यंत भुमिगत नाली बांधकाम करणे. | 5.00 | 2.50 |
| 40 | नरखेड | तिनखेडा | तिनखेडा | मौजा तिनखेडा अंतर्गत दिलिपजी काकडे ते लक्ष्मणजी डफरे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 41 | नरखेड | जामगाव (बु.) | जामगाव (बु.) | मौजा जामगाव (बु.) अंतर्गत गोपाल नागमोते ते बापुराव राऊत यांच्या घरापर्यंत सिमेंट रोड बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |
| 42 | नरखेड | खापा | खापा | ओपन नाली दयाल देवते ते मानव विकास केंद्र पर्यंत बांधकाम करणे. | 5.00 | 2.50 |
| 43 | काटोल | डोंगरगाव | डोंगरगाव | मौजा डोंगरगाव येथे सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 10.00 | 5.00 |

| अ. क्र. | पंचायत समिती | ग्रामपंचायतीचे नाव | गावाचे नाव | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (रुपये लाखात) | या आदेशाद्वारे वितरीत करण्यात येणारा निधी (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 44 | नागपूर (ग्रा.) | लोणारा | चक्कीखापा | ग्रा.पं. लोणारा येथील मौजा चक्कीखापा वार्ड क्र. 1 येथे स्मशान भूमी संरक्षण भींत व सौदर्यकीकरण | 10.00 | 5.00 |
| 45 | नागपूर (ग्रा.) | लोणारा | लोणारा | मौजा लोणारा येथे स्मशान घाट बनविणे | 10.00 | 5.00 |
| 46 | नागपूर (ग्रा.) | किन्हाळमाकडी | किन्हाळमाकडी | मौजा किन्हाळमाकडी वार्ड क्र.1 येथील स्मशानभुमीकडे जाणारा सिमेंट रस्ता बांधकाम | 10.00 | 5.00 |
| 47 | नागपूर (ग्रा.) | किन्हाळमाकडी | खापरी (सुभेदार) | ग्रा.पं.किन्हाळमाकडी येथील मौजा खापरी (सुभेदार) वार्ड क्र.2 येथे कवडूजी चौधरी यांचे घरापासून ते पाण्याची टाकी पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे | 10.00 | 5.00 |
| 48 | नागपूर (ग्रा.) | सोनेगाव बोरी | सोनेगाव बोरी | गावांतर्गत सिमेंट रस्ता बांधकाम | 10.00 | 5.00 |
| **एकूण** | | | | | 430.00 | 215.00 |

**(या आदेशान्वये वितरीत निधी अक्षरी रुपये दोन कोटी पंधरा लक्ष फक्त)**

**(डॉ. विपीन, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती, नागपूर**